महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |

क्रमांक: पुविंम/शाखा/डीपी/ 444
पुणे :- ४११ ००५
दिनांक :- 19/01/2026

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जि. प. पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी - मार्च २०२६ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत...

संदर्भ:- क्र.रा.मं/परीक्षा-८/४५११ दि. ०१.०१.२०२६ रोजीचे राज्यमंडळाचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) दि. १०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. २०/०२/२०२६ ते १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेसाठी देखील सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. सकाळी ११.०० पूर्वी व दुपारी ३.०० पूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिकांचे वितरण होणार नाही. याबाबत आपल्या जिल्हातील सर्व परिरक्षक, केंद्रसंचालक व पर्यवेक्षक यांना सूचित करण्यात यावे.

परीक्षा दालनात ज्या क्रमाने परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप होईल, त्याच क्रमाने परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर लिखित उत्तरपत्रिका परीक्षार्थ्यांकडून गोळा करण्याच्या सूचना सर्व दालन पर्यवेक्षकांना संबंधित परिरक्षक व केंद्रसंचालक यांचेमार्फत देण्यात याव्यात. पेपरच्या निर्धारित वेळेनंतर शेवटी दहा मिनिटे वेळ विद्यार्थ्यांना वाढवून देण्यात यावा. परीक्षा कालावधीत द्यावयाचे घंटेचे सुधारित नियोजन सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालये तसेच परिरक्षक, केंद्रसंचालक व पर्यवेक्षक यांना कळविण्यात यावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

MBRaut
(डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

प्रत माहितीस्तव-

मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे-०४

प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी-

१. सर्व परिरक्षक, जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर
२. सर्व केंद्रसंचालक जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर